**नि.क. ०२/क**

फौजदारी प्रक्रिया संहिता **१९६७/२०२२** चा अभिलेख

**मा. ए.ए. पांडे न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, पनवेल यांचे न्यायालयात**

| | | | |
|---|---|---|---|
| १) | अपराध घडल्याचा दिनांक | : | ०७/०३/२०२२ |
| २) | अहवाल किंवा फिर्यादीचा दिनांक | : | २०/०६/२०२२ |
| ३) | फिर्याददाराचे नाव, वय व त्यांचे निवासस्थान इ. | : | कुणाल दिलीप पाटील<br>पोलिस नाइक २१३१<br>तळोजा पोलिस स्टेशन |
| ४) | आरोपीचे नाव, वय व त्यांचे निवासस्थान इ. | : | **प्रदिप दयानंद महाना**<br>वय २१ वर्षे, व्यवसाय – हॉटेल<br>रा. पडघागाव फाटा, पडघा, ता पनवेल जि रायगड |
| ५) | ज्याच्याबद्दल फिर्याद दिली आणि जो अपराध आरोपीला समजावून सांगण्यात आला त्या अपराधाचा तपशील | : | खालीलप्रमाणे – |

तुम्ही आरोपी यांनी दिनांक ०७/०३/२०२२ रोजी २२.५० वाजताच्या सुमारास गणेश हॉटेल, पडघागावफाटा, एमआयडीसी तळोजा, ता. पनवेल जि. रायगड येथे विनापरवाना, अवैधरित्या देशी व विदेशी दारु तुमच्या ताबे कब्ज्यात बाळगून विक्री करीत असताना मिळून आला, म्हणून तुम्ही **महाराष्ट्र दारुबंदी कायदा कलम ६५ (ई)** नुसार प्रमाणे शिक्षापात्र गुन्हा केला आहे. सदरचा गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येतो.

यावरून मी असा आदेश देतो की, उपरोक्त कलमांतर्गत तुमच्याविरूद्ध खटला चालविण्यात यावा.

ब. कलम व अधिनियम :– **महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९**

**कलम ६५ (ई)**

**<u>आरोपीचे प्रतिकथन</u>** :

प्रश्न क्र. १ : तुम्हाला पोलीस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय?
उत्तर : होय

प्रश्न क्र. २ : तुम्हाला आता तुमच्यावर ठेवण्यात आलेला आरोप वाचून समजावून सांगण्यात आला तो तुम्हांला समजला का?
उत्तर : होय

प्रश्न क्र. ३ : तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तर : होय, मला गुन्हा कबुल आहे.

समक्ष

न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, पनवेल

....................................
(आरोपीची सही/अंगठा)

आरोपीला माझे समक्ष आरोपाचा तपशील त्याच्या भाषेत सुनावण्यात आला तो त्यास कबूल आहे.

ठिकाण : पनवेल (ए.ए. पांडे)
दिनांक : २०.०६.२०२२ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पनवेल

**<u>न्यायनिर्णय</u>**
**(ता. २०.०६.२०२२ )**

१. आरोपीवर महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ कलम ६५ (ई) अन्वये गुन्हयाचा आरोप आहे. आरोपीस न्यायालयासमोर हजर केले. आरोपीने गुन्हा कबूल केला. आरोपीने कबूल केलेल्या गुन्हयाचे शिक्षेकरिता मा. सरकारी

वकिल यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. त्यांनी जास्तीतजास्त शिक्षा देण्याची विनंती केली. आरोपीच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला.

२. आरोपीने गुन्हा कबूल केल्याने त्यास होणा—या शिक्षेबाबत त्याचे म्हणणे विचारात घेण्यात आले. आरोपीने विनंती केली की, तो सध्या बेरोजगार आहे. त्याची आर्थिक परिस्थिती सधन नाही. त्याचे कुटुंब त्याचेवरती अवलंबून आहे. तसेच, त्याची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने कमीतकमी दंडाची शिक्षा करावी.

३. मी खटल्यातील कागदपत्रे बारकाईने पाहिली. आरोपीने गुन्हा कबुल केला असून त्याच्यावर असलेला दोषारोप त्याने मान्य केलेला आहे.

४. आरोपीने आज रोजी गुन्हा कबूल करुन कमीतकमी शिक्षा देण्याची विनंती केली आहे. तसेच आरोपी याचेवर त्याचे कुटुंबीय अवलंबून असून, त्यांची सर्वस्वी जबाबदारी ही आरोपीवर आहे. वरील सर्व बाबी, आरोपीची परिस्थिती तसेच, गुन्हयाचे स्वरुप विचारात घेउन आरोपीला कमीतकमी आर्थिक दंड करणे न्यायोचित होईल. मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे —

**आ दे श**

१. आरोपी **प्रदिप दयानंद महाना** यांस महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ कलम ६५ (ई) या गुन्हयासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ नुसार दोषी ठरविण्यात येत आहे.

२. आरोपीला महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ कलम ६५ (ई) प्रमाणे रक्कम रु. २५,०००/— (रुपये पंचवीस हजार मात्र) दंड ठोठावण्यात येत आहे. दंड न भरल्यास दोन दिवस साधी कैद भोगावी लागेल.

ANIL SAHEBRAO SONWALKAR
Digitally signed by ANIL SAHEBRAO SONWALKAR
Date: 2022.06.30 12:07:59 +0530

ठिकाण : पनवेल (ए.ए. पांडे)
दिनांक : २०.०६.२०२२ **प्रभारी** न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पनवेल

| | | |
|---|---|---|
| निकाल घोषित केल्याची तारीख | :— | २०.०६.२०२२ |
| निकाल टंकलिखित केल्याची तारीख | :— | २०.०६.२०२२ |
| निकालावर सही केल्याचा दिनांक | :— | २०.०६.२०२२ |